वाचले:-

१ आदेश क्रमांक- प्रशा/६/कावि/८४६/२०२२ दिनांक १०/१०/२०२२

२ क्षेत्रीय अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.- बक्षेआ/२/कावि/१३१९/२०२३ दिनांक २९/१२/२०२३

३ आदेश क्रमांक - प्रशा/२/कावि/७९५/२०१७ दिनांक ०१/११/२०१७

४ आदेश क्रमांक - प्रशा/२/कावि/७४/२०२१ दिनांक २८/०१/२०२१

५ सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १२/ ६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग.
क्रमांक साप्रवि/६अ/कावि/१०/२०२४
दिनांक १२/६/२०२४

**विषय :- श्री.करण राजेश गोडावले, सफाई कामगार(संगणक क्र.१३४००) यांची नियुक्ती नियमित करणेबाबत ......**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर श्री.करण राजेश गोडावले यांची वाचले क्र.१ चे आदेशान्वये एस-1 वेतनश्रेणी र.रु.१५०००-४७६०० या वेतनश्रेणीत सफाई कामगार या पदावर रुजू तारखेपासुन प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरिता आदेशामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहुन पुर्णत: हंगामी स्वरुपाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री.करण राजेश गोडावले हे दिनांक १७/१०/२०२२ रोजी सामान्य प्रशासन विभागात सफाई कामगार या पदावर रुजू झाले आहेत. श्री.करण राजेश गोडावले यांचा सफाई कामगार पदावरील परिविक्षाधीन कालावधी दिनांक १६/१०/२०२३ रोजी संपुष्टात आला आहे.

क्षेत्रीय अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त वाचले क्र.२ चे पत्रान्वये कामकाज अहवाल सादर केला आहे त्यामध्ये श्री.करण राजेश गोडावले यांचे परिविक्षाधीन कालावधीमधील कामकाज, हजेरी व वर्तणुक समाधानकारक आहे व त्यांच्या विरुध्द सद्यस्थितीत कोणतीही खातेनिहाय चौकशी चालु अथवा प्रस्तावित नाही असे नमूद केले आहे तसेच त्यांची सफाई कामगार पदावर नियुक्ती नियमीत करणेस स्पष्ट शिफारस केली आहे.

सबब मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त वाचले क्रमांक ३ व ४ अन्वये प्राप्त अधिकारानुसार **श्री.करण राजेश गोडावले** यांना **"सफाई कामगार"** पदावर देण्यात आलेली नियुक्ती, मुळ नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीचे अधिन राहुन रुजू दिनांक १७/१०/२०२२ पासून नियमित करण्यास या आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद उपरोक्त कर्मचा-याचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(विठ्ठल जोशी)
**उप आयुक्त,**
**सामान्य प्रशासन विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११ ०१८**

प्रति, श्री.करण राजेश गोडावले,सफाई कामगार

प्रत:- १. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३.साप्रवि टेबल क्र. ७,१०,१२,२२

४. सामान्य प्रशासन विभाग- संगणक कक्ष

५. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ.

६. पिं.चिं.मनपा सेवकाची सहकारी पतसंस्था

७. संबंधित विभागप्रमुख - ब क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभाग